संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# कोकणाला स्मार्ट बनवण्याची 'स्मार्ट' खेळी

कोकणासंदर्भात केंद्र सरकारने घेतलेला निर्णय केवळ निवडणुकीच्या फायद्यासाठी असेल तर मात्र ती राजकीय साठमारीच ठरेल. गेल्या अनेक वर्षांपासून कोकणात पर्यावरणाच्या कारणास्तव अनेक गोष्टींचे निर्बंध लादले गेले होते. अगदी समुद्र किनारपट्टीवर बांधकाम करण्याच्या मुद्यापासून ते कोकणातल्या खनिज संपत्तीचा वापर रोखण्यापर्यंत त्याचा समावेश होता. आता मात्र कोकणातल्या जवळपास ९८६ गावांवर असलेला पर्यावरणविषयक निर्बंध हटवण्याचा निर्णय केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी घेतला. या निर्णयामुळे कोकणातल्या काही गोष्टींचा विकास होणे सोपे जाऊ शकते. विशेषत: मध्यम स्वरूपाचे उद्योग काही पायाभूत सुविधा खनिज संपत्तीवर आधारित काही प्रकल्प पर्यटनाला पूरक ठरणाऱ्या उद्योगांना परवानगी देण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरू शकते. मात्र यासंदर्भात पश्चिम घाटाचा पर्यावरणविषयक अभ्यास करणाऱ्या समितीच्या शिफारशींकडे दुर्लक्ष होता कामा नये. कारण कोकणाचा काही हजार किलोमीटरचा प्रवास हा निसर्गाच्या साधनसंपत्तीने नटलेला आहे. त्याचे हे पर्यावरणविषयक महत्त्व अबाधित राहिले पाहिजे. कारण आज विकासाच्या नावाखाली निसर्गाचा वाटेल तसा घास घेतला जातो. अगदी बेसुमार जंगलतोडीपासून ते पायाभूत सुविधांसाठी डोंगरच्या डोंगर खणून काढण्याचे अत्यंत दुर्दैवी प्रकार घडत असतात. सुविधा निर्माण करीत असताना सगळ्या पर्यावरणाचा समतोल बिघडेल अशा प्रकारचा खेळखंडोबा होता कामा नये. आतापर्यंत पर्यावरणाचा गंभीरपणे विचार करूनच विकासकामांना परवानगी दिली जात नव्हती. अर्थात याचा अर्थ या निर्बंधांमुळे कोकणाचा विकास अडून राहिला होता असे नाही. फक्त सरकारने याबाबतीत काही मार्ग शोधण्याचे कष्ट घेतले नाहीत. विकास करताना निसर्गाला नख लागणार नाही असे कौशल्य दाखवता आले असते. आतादेखील या बौध्दिक कौशल्याची दिवाळखोरी टाळण्यासाठीच हे निर्णय घेतले गेले आहेत. ते भलेही आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर घेतले जात असले तरीदेखील कोकणाच्या विकासाचा तो काही अनुशेष होता. तो किती दिवस रोखायचा हादेखील प्रश्न होता. आज ना उद्या यासंदर्भामध्ये निर्णय घेणे क्रमप्राप्त होते. कारण याच पर्यावरणाच्या कारणावरून जैतापूरच्या अणुऊर्जा प्रकल्पाला विरोध झाला आहे हे विसरता येणार नाही. आणि आता हे निर्बंध हटवण्यामागेदेखील केंद्र सरकारची कुठली तरी मोठी योजना असण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याला शिवसेनेने किंवा कोकणातल्या लोकांनी विरोध करू नये याची पूर्वतयारी म्हणून कदाचित हे निर्बंध हटवले गेले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### कोकणाची स्वतंत्र ओळख कायम हवी

निवडणुकीच्या केवळ दीड दोन महिने आधी हे निर्बंध हटवल्यामुळे त्याचा सेना-भाजपाला फार मोठा राजकीय फायदा होईल, असा अर्थ काढण्याची गरज नाही.कोकण ही काही कोणत्याही राजकीय पक्षाची मक्तेदारी किंवा सुभेदारी नाही; पण या ना त्या कारणाने कोकणाच्या निसर्गसंपदेवर राजकीय कुरघोडी करण्याचा प्रयत्न होत असेल तर मात्र तीदेखील समजून घेतली पाहिजे. विकास हा पर्यावरण आणि एकूणच समाजजीवनाचे हित लक्षात घेऊनच झाला पाहिजे. त्याकडे राजकीय चष्म्यातून बघण्याची गरज उरत नाही. दुर्दैवाने आपल्या देशात आतापर्यंत विकासाची सगळी धोरणे ही राजकारणाच्या तराजूमध्येच मोजली गेली.आणि संधीसाधूपणा करून सत्तेचे लोणी मटकावण्याचा प्रकार झाला. तोच प्रकार जर मोदी सरकार आल्यानंतरही चालू राहणार असेल तर मग कोणताच फरक पडलेला नाही असे म्हणावे लागेल. राजकारणाचा परिघ सोडून ठोस अशा निकषांवर कोकणाच्या विकासाची भरीव मांडणी व्हायला हवी. निर्बंध हटवडण्यामागे नेमकी काय काय कारणे आहेत. याचादेखील स्पष्ट खुलासा सरकारने केला पाहिजे. एवढेच नव्हे तर हे निर्बंध हटवल्यानंतर कोकणाच्या विकासाची दिशा कशा पध्दतीची राहू शकते. याचा निर्देशही होणे गरजेचे ठरते. आतापर्यंत खरे तर कोकणाच्या हितासाठीच हे निर्बंध असल्याचा प्रचार केला गेला होता. अन्यथा असे कोणतेच नियम नसते तर मुंबईतल्याच उद्योगपतींची आणि बिल्डरांची टोळधाड केव्हाच तिथे जाऊन धडकली असती. आमची तर अशी शंका आहे की, नरेंद्र मोदी यांना संपूर्ण देशात शंभर स्मार्ट शहरे निर्माण करायची आहेत. त्यातले एखादे शहर कोकणपट्ट्यामधले असू शकते. ते निर्माण करताना पर्यावरणाचा कोणताही अडथळा येऊ नये म्हणून हे निर्बंध हटवण्याची चाल खेळली गेलेली असू शकेल. स्मार्ट कोकणासाठी हे 'स्मार्ट' पाऊल उचलण्याचा स्मार्टपणा केंद्र सरकारने दाखवलेला दिसतो.

### येवा कोकणात कोणीही घुसा

संपूर्ण कोकणपट्टीचा विचार केला तर त्याचा अतिशय वेगळ्या पध्दतीने विकास होऊ शकतो. आज जगामध्ये अनेक असे समुद्र किनारे आहेत की, जिथे पर्यावरणाला धक्का न लावता त्यांचा विकास केला गेलेला दिसून येतो. सुदैवाने जगातल्या अशा सुंदर किनारपट्टींमध्ये कोकणचाही समावेश होतो. खरोखरच निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केलेला हा परिसर जपण्याचा तितकाच हळूवार प्रयत्न झाला पाहिजे. खरे तर या परिसराचा विकास केवळ पर्यावरण पूरक अशा उद्योगातून आणि व्यवसायातूनच होऊ शकतो. झाडी किंवा डोंगरदऱ्यांना धक्के देऊन हा विकासाचा बुलडोझर फिरवण्याची काही गरज नाही. म्हणूनच केंद्र सरकारने अचानक अगदी नेमक्या ९८६ गावांवरचे निर्बंध हटवण्याचे नेमके कारण काय हेदेखील उलगडले पाहिजे. मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय महानगरीला लागून असलेली ही किनारपट्टी फार दिवस मूलभूत विकासापासून वंचित ठेवताच येणार नव्हती. त्याची सुरुवात हे निर्बंध हटवून झालेली आहे असे म्हणता येईल. मात्र याचा अर्थ कोणीही यावे आणि कोकणाचे विकासाच्या नावाखाली लचके तोडावेत असा होत नाही. येवा कोकण आपलाच आसा. ही आतिथ्यशिलता म्हणजे त्यातले सौजन्य समजून घेण्याची प्रक्रिया आहे. जर का याच प्रवृत्तीचा गैरफायदा घेऊन येवा आणि कोकणात कोणीही घुसा असे अजिबात होता कामा नये. निदान पर्यावरणाच्या कारणांमुळे आतापर्यंत कोकणाने आपली स्वतंत्र ओळख कायम टिकवली होती ती तशीच राहिली पाहिजे. त्याला धक्का न लावता या निर्बंधांचे नेमके संबंध तपासले गेले पाहिजेत. तेवढाच कोकणाला त्याचा खऱ्या अर्थाने उपयोग होईल.